# प्रकरण तिसरे

## अभ्यासाची संशोधन पध्दती

(१) अभ्यासाची संशोधन पध्दती --

सर्वसाधारणपणे, समाजात आपणास असे चित्र दिसते की, ग्रामीण भागातील बहुसंख्य मुले शाळेला जात नसलेली दिसून येतात. प्रत्येक गावामध्ये प्राथमिक शाळांची सोय उपलब्ध असताना गावातील मुलांनी शिक्षण घेण्यापासून वंचित का राहावे ? शिक्षण हा मानवी जीवनाच्या विकासाचा मुलाधार आहे. शिक्षणामुळेच व्यक्तीच्या व्यक्तीमत्वाचा आणि मुलांच्या ठिकाणी असणाऱ्या सुप्तगुणांचा विकास घडवून आणता येतो. शिक्षण ही प्रत्येक व्यक्तीची मूलभूत अशी गरज आहे. परंतु समाजात शिक्षणापासून वंचित राहणारा वर्ग अद्याप मोठा आहे. आणि त्यात विशेष करून ग्रामीण विभागातील शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या स्त्रिया आणि पुरुषांचे प्रमाण अधिक आहे. या स्त्री-पुरुषांनी शिक्षणापासून वंचित राहण्यामागील परिस्थिती काय असावी ? त्या परिस्थितीचा मागोवा घेण्याची जिज्ञासा मनामध्ये उत्पन्न झाल्यावाचून राहत नाही. म्हणूनच कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील मौजे - सांगाव आणि करवीर तालुक्यातील मौजे - म्हाळुंगे ही दोन खेडी निवडून तेथील मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागील कारणाचा मी शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांच्या परिस्थितीचा शोध घेण्यासाठी पुढीलप्रमाणे संशोधन तंत्राचा प्रामुख्याने अवलंब केला.

(२) अभ्यासाची उद्दिष्टये --

शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांच्या कारणाचा शोध घेण्यासाठी पुढील उद्दिष्टये समोर ठेवण्यात आली होती :--

(१) मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागील जाती, समूह आणि कौटुंबिक वातावरणाचा शोध घेणे,

(२) खालच्या आणि वरिष्ठ हिंदू समाजातील जातीच्या मुलांच्या कुटुंबाचा तुलनात्मक अभ्यास करणे,

(३) लिंगभेदानुसार वंचित ठेवले जाण्याचे प्रमाण शोधणे,

(४) कुटुंबाच्या जात व्यवसायानुसार वंचित ठेवले जाण्याचे प्रमाण शोधणे,

(५) माता-पिता यांच्या साक्षर-निरक्षरतेनुसार त्यांच्या मुलांचे वंचितांचे प्रमाण शोधणे,

(६) पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणविषयक जाणीवाप्रमाणे वंचितांचे प्रमाण पहाणे,

(७) कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीचा मुलांच्या शिक्षणावरील परिणाम पहाणे,

(८) मुलांच्या कुटुंबाचे सामाजिक पर्यावरण आणि वंचितता यातील संबंध शोधणे.

ही उद्दिष्टये समोर ठेवून कोल्हापूर जिल्हातील दोन खेड्यातील शैक्षणिक - दृष्ट्या वंचित आणि अवंचित राहिलेल्या मुलांच्या पालकांच्याकडून मुलाखत - अनुसूचिव्दारे प्रत्यक्ष भेटून माहितीचे संकलन केले.

(३) सिध्दान्तकल्पना --

मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागील कारणाचा शोध घेण्याच्यादृष्टीने खालील सिध्दान्तकल्पना करण्यात आल्या :---

(१) कुटुंबाचे दारिद्र्य हे पालकांना त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत होते,

(२) पालकांचे अज्ञान आणि अशिक्षितता ही त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास भाग पाडते,

(३) बेकारीच्या वाढत्या समस्यामुळे पालक त्यांच्या मुलांना शिक्षणापासून दूर ठेवतात.

(४) कारागीर आणि बिगर-कारागीर कुटुंबातील (मराठा, सुतार, लोहार, महार, मांग आणि चांभार ) पालक हे त्यांच्या मुलांचा कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून उपयोग करुन घेतात.

(५) प्रतिकूल सामाजिक पर्यावरण मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरते,

(६) पालकांचा योग्य मार्गदर्शनाचा अभाव मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरतो,

(७) शिक्षणाचा व्यावहारिक जीवनातील निरुपयोग मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास कारणीभूत ठरतो,

(८) पालकांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जाणीव नसते त्यामुळे मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागते.

अशा उपरोक्त कारणांच्यामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहत असावीत, या सिध्दान्तकल्पनेनुसार शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्याकडून माहितीचे संकलन केले.

(४) अभ्यासाचे क्षेत्र --

सर्वसाधारणपणे, साक्षरतेमध्ये वृध्दी करण्यासाठी शैक्षणिक प्रसाराचे कार्य शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही विभागामध्ये करण्यात आले आहे.परंतु दोन्ही विभागामध्ये शैक्षणिक प्रगतीमध्ये असंतुलन निर्माण झालेले आहे. शहरी समाजापेक्षा ग्रामीण समाजामध्ये शैक्षणिक प्रगती फारशी घडून आलेली दिसून येत नाही. भारतदेशामध्ये जवळ जवळ ७५ टक्के लोक ग्रामीण भागात राहतात.या ग्रामीण भागातील बहुसंख्य लोकांना साक्षर करण्यानेच देशाचा खऱ्या अर्थाने विकास घडून येणार आहे. ग्रामीण भागात राहणारा माणूस अनेक प्रकारच्या समस्यांनी त्रस्त झालेला दिसून येतो. त्यांच्या समस्यांची सोडवणूक आणि त्याची प्रगती त्याला शिक्षण देऊन शहाणे करण्यानेच शक्य होणार आहे. यामुळेच तर शासनाने ग्रामीण शिक्षण प्रसाराला गती दिल्याचे दिसते .

8634
A.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंचवार्षिक योजनांच्याव्दारा शिक्षणाची संधी शहरी आणि ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीला मिळाली पाहिजे यासाठी प्राथमिक शिक्षण घटनेच्या ४५ व्या कलमाप्रमाणे मोफत आणि सक्तीचे केले आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणाची सक्ती शासनाने केली असली तरी ग्रामीण समाजातील किती व्यक्तींनी या सक्तीच्या सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा लाभ घेतला आहे हा एक चिंतेचाच विषय होऊन बसला आहे. सन १९८१ च्या जनगणनेनुसार ग्रामीण साक्षरतेचे प्रमाण बघितले तर अद्यापही जवळ जवळ ७० टक्के लोक शिक्षण घेण्यापासून अलिप्त राहिलेले पाहावयास मिळतात.

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिक्षण प्रसाराचा आणि प्रगतीचा मागोवा घेतला तर या भागामध्ये जवळ जवळ ६० टक्के लोक शिक्षण घेण्यापासून वंचित राहिले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल आणि करवीर तालुका हा डोंगर, पठार, नद्या, नाले अशा नैसर्गिक पर्यावरणाने व्याप्त असल्यामुळे या भागामध्ये दळणवळण, रस्ते यांच्या सोई सुपश्या झालेल्या नाहीत. याचाच परिणाम म्हणून शासनाला कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात म्हणाव्या-तश्या शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करता आलेल्या नाहीत. शिक्षणाच्या संधीचा फायदा या भागातील लोकांना घेता न आल्यामुळे येथील लोक अज्ञानी, अशिक्षित आणि परंपरागत समाज-व्यवस्थेला चिकटून असलेले दिसून येतात. आणि त्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचे महत्वही पटलेले नाही. कोल्हापूर जिल्ह्यातील जवळ जवळ सर्वच गांवामध्ये आणि खेड्याच्या जवळपास शाळांची सोय उपलब्ध करुनही खेड्यातील बहुसंख्य मुले-मुलीं शिक्षण घेण्यापासून अलिप्त राहिलेली आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागील कारणांचा शोध घेण्याच्या प्रबल इच्छेने मी या जिल्ह्यातील कागल तालुक्यातील मौजे-सांगाव आणि करवीर तालुक्यातील मौजे-म्हाळुंगे या वेगवेगळ्या तालुक्यातील दोन खेड्यांची निवड केलेली आहे. आणि तेथील मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागची परिस्थिती उजेडात आणण्याचा प्रयत्न करुन त्या मुलांनी शिक्षणापासून वंचित राहू-नये यासाठी

समाजाला किंबहुना शासनाला काही विधायक कार्यक्रम राबवता यावा यासाठी हा शोध प्रबंध अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

(५) निवडलेले जातीसमूह --

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील जवळ जवळ प्रत्येक खेड्यामध्ये प्रामुख्याने मराठा, सुतार, लोहार, महार, मांग आणि चांभार हे जाती समूह विशेषत्वाने आढळून येतात. या जाती समूहाचे प्रमाण इतर जाती समूहा पेक्षा अधिक आहे. संख्येच्यादृष्टीने अधिक असलेल्या या जाती समूहातील कुटुंबाची निवड करून मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागची परिस्थिती शोधणे हे ख-या अर्थाने यथार्थ ठरणार आहे. म्हणूनच अभ्यासासाठी या जाती समूहातील कुटुंबांची निवड केलेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील मौजे-सांगाव आणि करवीर तालुक्यातील मौजे-म्हाळुंगे या दोन्ही खेड्यामध्ये या जातीसमूहातील कुटुंबांची संख्या इतर जातीसमूहातील कुटुंबापेक्षा अधिक आहे. आणि या जाती समूहातील मुले शिक्षणापासून अधिक प्रमाणात वंचित राहिलेली दिसून येतात. ग्रामीण भागामध्ये या जातीसमूहातील कुटुंबातील मुलांना घरची आणि घरा - बाहेरील अशी बरीच कामे करावी लागतात. विशेषत: मराठा जातीच्या कुटुंबातील मुले शेती व्यवसायामध्ये, सुतार जातीची मुले शेती आणि सुतार कामामध्ये , लोहार जातीच्या कुटुंबातील मुले शेती व लोहार कामामध्ये, महार जातीच्या कुटुंबातील मुले शेती, रोजगार करण्यामध्ये, मांग जातीच्या कुटुंबातील मुले शेती, रोजगार आणि जात व्यवसायामध्ये आणि चांभार जातीच्या कुटुंबातील मुले शेती, रोजगार व जात व्यवसायामध्ये सहभागी झालेली असतात. त्यामुळे या जातीच्या कुटुंबातील मुलांना शिकण्यासाठी पुरसा वेळ मिळत नाही व त्यांच्या शिक्षणामध्ये अनेक अडचणी निर्माण होतात. अर्थात मराठा, सुतार, लोहार, महार, मांग आणि चांभार या जातीची कुटुंबे निवड केलेल्या दोन्ही खेड्यामध्ये अधिक असल्यामुळे या जातीची मुले शिक्षण घेण्यापासून वंचित राहण्यामागच्या परिस्थितीचा वस्तुनिष्ठ शोध घेण्याच्यादृष्टीने या जाती समूहाची मी अभ्यासासाठी निवड केलेली आहे.

(६) तथ्य संकलन --

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्याकडून उद्दिष्टांना अनुसरुन माहितीचे संकलन करण्यासाठी ' मुलाखत - अनुसूचि ' या संशोधन तंत्राचा अवलंब केला. मुलांचे पालक हे कामानिमित्ताने दिवसभर शेतावर गेल्यामुळे त्यांच्या घरातील उपस्थितीच्या वेळी सायंकाळी आणि सकाळी त्यांना त्यांच्या घरी प्रत्यक्ष भेटून मुलाखत - अनुसूचितील प्रश्नांच्याव्दारे माहितीचे सविस्तर संकलन केले. माहिती संकलनाच्यावेळी मुलांचे पालक व वृध्द लोकही उपस्थित होते, त्यामुळे माहिती संकलनामध्ये पालकांचे आणि त्यांच्या घरातील वृध्द लोकांचेही साहाय्य मिळू शकले. माहितीचे संकलन हे माहे जुलै - ऑगस्ट, १९८८ मध्ये केले. माहिती संपादनाचा कालावधी हा पावसाळी दिवसांचा होता. या दिवसामध्ये पालक शेतीच्या कामामध्ये मग्न झालेले होते, त्यामुळे मुलाखतीसाठी पालकांची उपलब्धता वेळेवर होऊ शकली नाही. पालकांची मुलाखत घेण्यासाठी त्यांच्या घरी वारंवार जावे लागले. अर्थातच माहितीचे संकलन करण्यासाठी थोडा अधिक कालावधी लागला. एक महत्वाची बाब ही की पावसाळ्याचे आणि शेतीच्या कामाचे दिवस असल्यामुळे पालक त्यांच्या मुलांचा शेतीच्या कामासाठी उपयोग करुन घेत असल्याचे प्रत्यक्ष पाहयला मिळाले. काही वंचित मुलांच्या पालकांच्या मुलाखती ते काम करीत असलेल्या शेतामध्येच घेतल्या. त्यामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागचे कारण हे त्यांची मुले शेतीच्या कामात त्यांना मदत करत असल्याचे पाहून समजू शकले. मुलांचे पालक शेतीच्या व इतर कामासाठी मुलांच्या पेक्षा मुलींचा अधिक उपयोग करुन घेत असल्याचे निदर्शनास आले. यावरुन अद्यापही स्त्रीशिक्षणाकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केले जाते हे समजू शकले. माहितीचे संकलन करण्यासाठी खेड्यामध्ये गेल्यावर खेड्याच्या बाहेर पडीक माळावर काही मुले शाळेला न जाता जनावरे चारत असलेली भेटली. मी त्या मुलांचे नाव आणि त्यांच्या पालकांचे नाव विचारुन सायंकाळी त्याच्या घरी जाऊन मुलांच्या पालकांना भेटून मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागची

परिस्थिती समजावून घेतली. माहितीचे संकलन करण्यासाठी त्या खेड्यातील माझे ओळखीचे मित्र, विद्यार्थी, गावचे सरपंच, ग्रामसेवक, शाळेतील शिक्षक आणि खेड्यातील प्रतिष्ठित व्यक्तींनी सहकार्य केले. अर्थात मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागची परिस्थिती मुलाखतीव्दारे समजू शकली. शिवाय, काही कारणे प्रत्यक्ष डोळ्यानीही अनुभवता आली. त्यामुळे निवडलेल्या अभ्यास-विषयाची माहिती अत्यंत वास्तव स्वरुपात संकलित करणे शक्य झाले.

(७) पालकांचा प्रतिसाद --

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांच्याकडून मुलाखत अनुसूचिका योग्य असा प्रतिसाद मिळाला. मी जेव्हा निवडलेल्या दोन्ही खेड्यामध्ये माहिती संकलन करण्यासाठी गेलो तेव्हा मुलांच्या पालकांना मी कुणीतरी शासकीय अधिकारी असल्याचे वाटले आणि त्यांनी त्यांची मुले शाळेला कां जाऊ शकली नाहीत या संबंधाची योग्य माहिती सांगितली. पालकांनी त्यांच्या मुलांचा गरीबीच्या परिस्थितीमुळे रोजगारीसाठी उपयोग करुन घेत असल्याचे लक्षात आणून दिले. काही पालकांनी तर राहण्यासाठी योग्य निवास व्यवस्था नसल्याचे सांगून राहत्या घरात पावसामुळे ओल आल्याचे निदर्शनास आणून दिले. काही पालकांनी त्यांच्या मुलांना खुप शिकविण्याची इच्छा व्यक्त करुन त्यांची मुले उनाड मुलांच्या संगतीने शाळेला न जाता गावातून फिरणे आणि खेळत बसणे यामध्ये वेळ खर्च करीत असल्याचे सांगितले. सांगाव खेड्यातील एका मराठा जातीच्या कुटुंबातील वंचित मुलांच्या पालकाची मुलाखत घेत असताना मी त्यांना तुम्ही दारु पिता का ? असा प्रश्न विचारताच त्यांची पत्नी पटकन खोलीतून बाहेर आली आणि म्हणाली ' यांच्या दारुपायीच माझ्या मुलाच्या शिक्षणाचे वाटोळे झाले आहे ,हे दारु पिऊन गावातून फिरत असतात व घरातील आणि शेतीची कामे करीत नाहीत. माझ्या मुलालाच सर्व कामे करावी लागतात, त्यामुळेच त्याला शिकवता आले नसल्याचे सांगितले'. मौजे - म्हाळुंगे खेड्यातील एका मांग जातीच्या घटस्फोटित कुटुंबातील वंचित मुलाच्या पालकाने त्यांच्या कुटुंबाच्या दारिद्र्यामुळे त्याच्या प्रथम

पत्नीच्या मुलाला एका मराठा जातीच्या कुटुंबामध्ये त्यांची जनावरे राखण करण्यासाठी चाकरीला ठेवल्याचे सांगितले. ज्या मुलांचे वडिल हयात नाहीत अशा मुलांच्या मातांच्याकडून माहिती संपादन करीत असताना मातांनी त्यांच्या मुलांना शिकवावे वाटत होते पण मालक हयात नसल्याने घरची कामे मुलांना करावी लागतात, त्यामुळे त्यांना शिकविता आले नाही असे सांगितले. एकंदरीत माहिती संपादनामध्ये शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या पालकांनी अत्यंत उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. याशिवाय खेड्यातील ग्रामसेवक, प्रतिष्ठित व्यक्ती, सरपंच,शाळेतील शिक्षक यानीही मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागची वस्तुनिष्ठ माहिती पुरवली. मौजे - म्हाळुंगे येथील शिक्षकांने मुलांच्या पालकांचे अज्ञान आणि त्यांना त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जाणीव नसल्याचे सांगितले. मौजे सांगाव खेड्यातील ग्रामसेवकांने मुले पालकांचे ऐकत नाहीत आणि मुले खेळाकडे, उनाडपणा करण्याकडे आकर्षित होतात त्यामुळे ती शिकत नाहीत असे सांगितले. एकूण मुलाखत-अनुसूचिला दोन्हीही खेड्यातील पालकांनी चांगला प्रतिसाद दिला.

## (८) माहिती संपादनात आलेल्या अडचणी --

मुलाखत अनुसूचिव्दारे माहिती संपादन करतांना कोणत्याही पालकांने माहिती देण्यास नकार दर्शविला नाही. मात्र काही अपवादात्मक पालकांनी विचारलेल्या प्रश्नांची चुकीची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. मी काही पालकांना त्यांच्या जमिनीचे क्षेत्र किती आहे या संबंधी प्रश्न विचारला असता त्या पालकांनी त्याचे जमिनीचे क्षेत्र कमी असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला कारण जमिन अधिक आहे असे सांगितल्यास काळम्मावाडी धरणग्रस्तांना द्यावी लागेल याची त्यांना भिती वाटली. परंतु मी त्याच गावातील माझ्या सहकार्याच्याकडून त्यांनी दिलेल्या माहितीत दुरुस्ती करुन घेतली. या शिवाय दारु पिणाऱ्या आणि जुगार खेळणाऱ्या काही पालकांनी दारु व जुगार खेळत नसल्याची चुकिची माहिती देण्याचा प्रयत्न केला. परंतु या माहितीमध्येसुध्दा मी माझ्या सहकार्याच्या मदतीने दुरुस्ती करुन घेतली. एकंदरीत असे काही अपवाद वगळता मुलाखत - अनुसूचिला योग्य प्रतिसाद मिळाला. एक गोष्ट इथे प्रकर्षाने नमूद करावीशी वाटते ती अशी

की, साक्षर पालकांच्या पेक्षा निरक्षर पालकांनी मुलाखत अनुसूचितील विचारलेल्या प्रश्नांची अत्यंत वस्तुनिष्ठ उत्तरे दिली. मात्र काही आपवादात्मक साक्षर पालकांनी या मुलाखत - अनुसूचितील प्रश्नांना दिलेल्या उत्तरांचा त्यांना काहीच उपयोग नसल्याने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास त्यानी निरुत्साह दर्शविला. अर्थात, असे काही माहिती संपादनातील क्वचित अडथळे वगळता मुलाखत अनुसूचिला योग्य असाच प्रतिसाद मिळाला.

(९) <u>खेड्यांची माहिती --</u>

शैक्षणिकदृष्ट्या वंचित मुलांचे प्रमाण शहरी समाजापेक्षा ग्रामीण समाजामध्ये अधिक आहे. शासनाने गाव तिथं शाळा या धोरणाचा स्वीकार करुन निरक्षर लोकांना साक्षर करण्याच्यादृष्टिने प्रयत्न केले आहेत.परंतु अद्यापही शिक्षणापासून वंचित राहणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. शिक्षणापासून वंचित राहण्यामागे कोणती परिस्थिती कारणीभूत आहे याचा शोध घेण्यासाठी कोल्हापूर जिल्हातील कागल तालुक्यातील मौजे-सांगाव आणि करवीर तालुक्यातील मौजे - म्हालुंगे यादोन खेड्याची अभ्यासासाठी निवड केली. अभ्यासासाठी या दोन खेड्याची निवड करण्यामागे प्रामुख्याने दोन हेतू समोर ठेवले आहेत ते असे ---

(१) जे खेडे दळणवळण आणि रस्त्यांच्या सोईंनी सोईस्कर आहे आणि तेथे प्राथमिक, माध्यमिक व जवळपास उच्च-माध्यमिक व पदवीपातळीवरील शिक्षण घेण्याची सोय आहे अशा खेड्याची निवड करुन तेथील मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागील परिस्थितीचा शोध घेण्यासाठी मौजे - सांगाव या खेड्याची निवड केली.

(२) जे खेडे दळणवळण आणि रस्त्याच्या सोईंनी फारसे सोईस्कर नाही व तेथे केवळ प्राथमिक शिक्षणाचीच सोय आहे अशा खेड्याची निवड करुन तेथील मुले शिक्षण न घेण्यामागची परिस्थिती शोधण्यासाठी मौजे - म्हालुंगे या खेड्याची निवड केली.

निवड केलेल्या दोन्हीही खेड्यामधून कुटुंबाची संख्या अधिक असलेल्या मराठा, सुतार,लोहार,महार,मांग आणि चांमार या जातींची प्रामुख्याने अभ्यासासाठी निवड केली. या जातींच्या शिवाय ब्राह्मण व इतर जातींच्या कुटुंबाची संख्या अल्प असल्यामुळे त्या जातींची कुटुंबे अभ्यासासाठी निवडलेली नाहीत. दोन्हीही खेड्यातील अनुसूचित जातीच्या आणि बिगर अनुसूचित जातीच्या कुटुंबामध्ये शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांचे प्रमाण किती आहे याचा शोध घेण्यात आला. आणि कोणत्या जातीमध्ये कोणती कारणे मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यास अधिक प्रभावी ठरतात याचाही मागोवा घेता आला. अभ्यासासाठी निवड केलेल्या दोन्ही खेड्यांची माहिती पुढीलप्रमाणे ----

(अ) मौजे - सांगाव खेड्याची माहिती ---

मौजे - सांगाव हे खेडे कागल शहरापासून केवळ ५ कि.मी.वर आहे तर कोल्हापूर शहरापासून ते २२ कि.मी.अंतरावर आहे. हे खेडे कागल, कोल्हापूर, इंचलकरंजी, हुपरी अशा लहान मोठ्या शहराशी दळणवळण आणि रस्त्यांनी जोडले गेले आहे. या खेड्याचा शहरी वातावरणाचा खुपसा संपर्क आलेला आहे.या खेड्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची सोय आहे,त्याच - बरोबर येथील मुलांना उच्च माध्यमिक व पदवी पातळीवरील शिक्षण घेण्यासाठी खुप दूरवर चालावे न लागता जवळच असलेल्या ५ कि.मी. अंतरावरील कागल शहरामध्ये ते शिक्षण घेऊ शकतात किंवा कोल्हापूर शहरामध्ये जाऊन शिक्षण घेणेही त्यांना सोईस्कर आहे. या खेड्यातील प्रत्येक जातीच्या लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय असून ते काही प्रमाणात जातीचाही व्यवसाय करतात. आणि व्यापार,नोकरी या क्षेत्रातही आघाडीवर आहेत. या खेड्यामध्ये मराठा, सुतार,लोहार,महार,मांग आणि चांमार या जातींच्या कुटुंबाची संख्या सर्वसाधारणपणे अधिक आहे म्हणून अभ्यासासाठी या जाती समूहातील कुटुंबाची प्रामुख्याने निवड केलेली आहे. मराठा,सुतार,लोहार,महार,मांग आणि चांमार या जातींच्या कुटुंबाची एकूण संख्या पुढील प्रमाणे :---

तक्ता क्र.१

निवड केलेल्या जातींची एकूण कुटुंबे

| अ.क्र. | जात | एकूण कुटुंबे |
|---|---|---|
| १ | मराठा | ४९० |
| २ | सुतार | १० |
| ३ | लोहार | ९ |
| ४ | महार | ६० |
| ५ | मांग | ५० |
| ६ | चांभार | १० |
| | एकूण | ६२९ |

आधार : घरठाण पत्रक, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे - सांगाव
( १९८१ जनगणनाधारित )

मौजे - सांगाव खेड्यातील एकूण लोकसंख्या आणि साक्षर-निरक्षरांचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे ---

तक्ता क्र.२

मौजे-सांगाव खेड्याची लोकसंख्या आणि साक्षर-निरक्षर प्रमाण --

| अ.क्र. | व्यक्ती | एकूण लोक संख्या | अनुसूचित जातीची लोक संख्या (%) | साक्षर (%) | निरक्षर (%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुरुष | २,५६९ | ४०७(१५.८४) | १,५४०(५९.९४) | १,०२९(४०.०६) |
| २ | स्त्रिया | २,४८८ | ३८५(१५.४७) | ७९६ (३१.९९) | १,६९२(६८.०१) |
| ३ | एकूण | ५,०५७ | ७९२(१५.६६) | २,३३६(४६.१९) | २,७२१(५३.८१) |

टिप - कंसातील आकडे हे टक्केवारी दर्शवितात.

आधार -- Cencus of India, 1981, District Census Handbook Kolhapur, p.186.

शाळेची माहिती --

मौजे-सांगाव हे खेडे कसबा-सांगाव खेड्यापासून केवळ १ कि.मी.अंतरावर आहे. कसबा-सांगाव खेड्यामध्ये सन १८७५ साली शाळेची स्थापना झालेली होती. त्यामुळे मौजे-सांगाव येथील लोकांना त्यावेळी कसबा-सांगाव मधील शाळेत जाऊन शिक्षण घेणे शक्य होते. मौजे-सांगाव येथे सन १९२० मध्ये प्राथमिक शाळेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर मौजे-सांगाव आणि कसबा-सांगाव खेड्याच्या मध्ये अंतरावर मुलींच्या शिक्षणाची वेगळी अशी सोय व्हावी म्हणून १९५९ साली ' कन्या विद्या-मंदिर ' या मुलींच्या शाळेची स्थापना करण्यात आली.

मौजे सांगाव येथील प्राथमिक शाळेत सुरुवातीपासून मुलांची उपस्थिती अधिक असल्यामुळे तेथील शाळा प्रथमापासूनच अनेक शिक्षकी आहेत. या खेड्याला शिक्षणाची सोय खूप वर्षापासून झाली असल्यामुळे त्या ठिकाणी साक्षरतेचे प्रमाण काहीसे अधिक असल्याचे पहावयास मिळते. परंतु सारासार विचार करता शिक्षणापासून वंचित राहणाऱ्यांचेही प्रमाण अधिक आहे. या शाळेत गरीब आणि अनुसूचित जातींच्या कुटुंबातील मुला-मुलींची उपस्थिती कमी असल्याचे आढळून येते.

(ब) <u>मौजे-म्हाकुंगे खेड्याची माहिती</u> ---

मौजे म्हाकुंगे हे खेडे कोल्हापूर ते गारगोटी या मार्गावरील कूर्ये फाटयापासून उत्तरेस जवळजवळ ३ किलोमिटर अंतरावर वसलेले आहे. हे खेडे दळणवळणाच्या आणि रस्त्याच्याबाबतीत फारसे सोईचे नाही. हे खेडे कोल्हापूर शहरापासून जवळ जवळ २५ कि.मिटर अंतरावर आहे, त्यामुळे हे खेडे शहरी संपर्कापासून पूर्णपणे अलिप्त आहे. या ठिकाणी केवळ प्राथमिक शाळेचीच सोय आहे. येथील मुला मुलींना माध्यमिक,उच्च माध्यमिक आणि पदवी पातळीवरील शिक्षण घेण्यासाठी मोगावती, मुरगूड, कोल्हापूर अशा ठिकाणी दूरवर जावे लागते. या खेड्यातील प्रत्येक जातींच्या लोकांचा शेती हा मुख्य व्यवसाय आहे. आणि काही प्रमाणात प्रत्येक जातीचे लोक जातीचा व्यवसाय करताना आढळून येतात. या खेड्यामध्ये ब्राह्मण व इतर जातींच्या पेक्षा मराठा,सुतार,लोहार, महार,मांग आणि चांभार या जातींच्या कुटुंबाचे प्रमाण अधिक आहे. या खेड्यामध्ये साक्षर लोकांचे प्रमाण कमी असून शिक्षणापासून वंचित असणाऱ्या स्त्री-पुरुषांचे प्रमाण अधिक आहे. सर्वसाधारणपणे, संख्येच्याबाबतीत अधिक असलेल्या मराठा,सुतार,लोहार,महार,मांग,आणि चांभार या जातीच्या कुटुंबाची निवड करुन या कुटुंबातील मुले शिक्षण घेण्यापासून अलिप्त राहण्यामागची परिस्थिती शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

तक्ता क्र.३

निवडलेल्या जातींची एकूण कुटुंबे ---

| अ.क्र. | जात | एकूण कुटुंबे |
|---|---|---|
| १ | मराठा | ३३७ |
| २ | सुतार | ६ |
| ३ | लोहार | ४ |
| ४ | महार | ५३ |
| ५ | मांग | १८ |
| ६ | चांभार | ३७ |
| | एकूण | ४५५ |

आधार -- घरठाण पत्रक, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे-म्हाळुंगे
( १९८१ जनगणनाधारित )

मौजे-म्हाळुंगे खेड्यातील एकूण लोकसंख्या, मौजे-सांगाव खेड्यापेक्षा कमी आहे. शिवाय साक्षरतेचेही प्रमाण सांगाव पेक्षा (४६.११ टक्के) म्हाळुंगे पेक्षा (३६.२७ टक्के) कमी आहे.

तक्ता क्र.४

म्हाळुंगे खेड्याची लोकसंख्या आणि साक्षर-निरक्षर प्रमाण

| अ.क्र. | व्यक्ती | एकूण लोक संख्या | अनुसूचित जातीची लोकसंख्या(टक्केवारी) | साक्षर (टक्केवारी) | निरक्षर (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | पुरुष | १,३७१ | २६७(१९.४७) | ७३७(५३.७५) | ६३४(४३.२५) |
| २ | स्त्रिया | १,२८९ | २५६(१९.९०) | २२८(१७.६८) | १,०६१(८२.३२) |
| ३ | एकूण | २,६६० | ५२३(१९.६६) | ९६५(३६.२७) | १६९५(६३.७३) |

टिप -- कंसातील आकडे हे टक्केवारी दर्शवितात.

आधार -- Census of India, 1981, District Census Handbook, Kolhapur, p.166.

शाळेची माहिती --

मौजे-म्हाळुंगे येथे `जीवन शिक्षण विद्या-मंदिर` या शाळेची स्थापना सन १-६-१९०७ रोजी झाली. ही शाळा शासनाने सन १-६-१९१८ साली त्यांच्या ताब्यात घेतली. ही शाळा बरीच वर्षे एक शिक्षकी होती. या शाळेत एकच शिक्षक सन १९४१ सालापर्यन्त होते. अनेक शिक्षकी शाळा सन १९४२ साली सुरु झाली. पण सन १९५०-५१ साली पुन्हा एक शिक्षकी शाळा होती. आणि सन १९५४-५५ सालापासून ही शाळा अनेक शिक्षकी झाली. सन १९५७ सालापर्यन्त पहिली ते चौथी पर्यन्त या शाळेत वर्ग भरत होते. १९५८ साली ५वी च्या वर्गाला सन १९५९ साली ६वी च्या वर्गाला आणि १९६० साली ७वी च्या वर्गाला मान्यता मिळाली. त्यावेळेपासून आजपर्यन्त इयत्ता ७वी पर्यन्तच या गावी शिक्षणाची सोय आहे.

सारांश -- दोन्ही खेड्यांची माहिती विचारात घेता मौजे सांगाव हे खेडे मौजे - म्हाकुंगे खेड्यापेक्षा अनेक गोष्टीने सोईस्कर आहे, त्यामुळे मौजे - सांगाव खेड्यातील साक्षरतेचे प्रमाण मौजे - म्हाकुंगे खेड्यातील साक्षरतेपेक्षा काहीसे अधिक आहे. अर्थात, या दोन्ही खेड्यामध्ये साक्षरतेत काही प्रमाणात वाढ झाली असली तरी शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या मुलांचे प्रमाण काही कमी नाही.

(१०) तत्थ्य संपादनाची साधने --

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित मुलांच्या विषयी तत्थ्याचे संपादन करताना प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही साधनांचा उपयोग करण्यात आला, ती साधने पुढीलप्रमाणे :---

(अ) प्राथमिक साधने --

शैक्षणिकदृष्टया वंचित आणि अवंचित राहिलेल्या मुलांच्या विषयी तत्थ्याचे संकलन करण्यासाठी मार्गदर्शकांच्या सहकार्याने तयार केलेल्या ' मुलाखत - अनुसूचि ' या साधनाचा अवलंब केला. या मुलाखत-अनुसूचिव्दारे अभ्यासासाठी निवडलेल्या दोन्ही खेड्यातील मराठा, सुतार, लोहार, महार, मांग आणि चांभार जातींच्या कुटुंबातील मुलांच्या पालकांच्याकडून त्यांना त्यांच्या प्रत्यक्ष घरी भेटून माहितीचे संकलन केले. माहितीचे संकलन करण्यासाठी त्या गावातील माझे मित्र, विद्यार्थी यानी योग्य असे सहकार्य केले. शिवाय मुले शिक्षणापासून वंचित राहण्यामागील वास्तव पार्श्वभूमी त्या गावातील ग्राम-सेवक, सरपंच, शाळेतील शिक्षक आणि प्रतिष्ठित व्यक्ती यांनी योग्य प्रकारे समजावून सांगितली. अर्थात मुलाखत-अनुसूचि या साधनाचा अभ्यास विषया संबंधी प्राथमिक स्वरुपाची माहिती मिळविण्यासाठी चांगला उपयोग झाला.

(ब) दुय्यम साधने --

शैक्षणिकदृष्ट्या वंचित आणि अवंचित राहिलेल्या मुलांच्यासंबंधी लिखित स्वरुपात उपलब्ध असणाऱ्या दुय्यम साधणाचाही आधार घेऊन योग्य अशा माहितीचे संकलन केले. दुय्यम साधने म्हणून उपलब्ध असणाऱ्या पुढील लिखित साधनांचा उपयोग करण्यात आला.

(१) शैक्षणिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या मुलांच्या विषयी अनेक अभ्यासकांनी आणि संशोधकांनी प्रसिध्द केलेले संशोधनात्मक लेख आणि पुस्तके याचा उपयोग केला.

(२) कोल्हापूर, महाराष्ट्र आणि भारत देशांचे जनगणनाविषयक अहवाल उपयोगात आणले.

(३) मौजे-सांगाव आणि मौजे - म्हाकुंगे ग्रामपंचायत कार्यालयामधील त्या गावची लोकसंख्या, साक्षर निरक्षर प्रमाण आणि जातींची एकूण कुटुंबाची संख्या इत्यादीची माहिती तेथील रजिस्टर वरुन मिळविली.

थोडक्यात, निवडलेल्या अभ्यास विषयासंबंधी माहितीचे संपादन करण्यासाठी वरीलप्रमाणे प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला.

(११) वंचिततेची संज्ञा --

वंचितता हा शब्द १९७० च्या शब्दकोशात आलेला आहे . निरनिराळ्या अभ्यासकांनी आणि विचारवंतानी याची निरनिराळी व्याख्या केलेली आहे. त्या पुढीलप्रमाणे आहेत :--

(१) सरकिथ जोसेफ यांच्यामते -- ' वंचितता म्हणजे अशी परिस्थिती की ज्या योगे व्यक्तीतील सुप्तसामर्थ्यांचा विकास होण्यास अडथळा निर्माण होतो (उदा. गरिबी, व्यक्तीत्व दोष, दुर्बलता, नैराश्य ) '[१]

---

१ जोसेफ, सर किथ - यांची वंचिततेची संज्ञा , शशिकला पु.देशपांडे यांनी झोपडपट्टीतील शैक्षणिक वंचितता (संशोधन अहवाल), शिक्षण आणि समाज, वर्ष ६। अंक ३, एप्रिल-जून १९८३, पृ.२१२ मध्ये दिली आहे.

(२) <u>एस.आनंदलक्ष्मी यांच्या मतानुसार</u> ` वंचितता ही प्रामुख्याने आर्थिक बाबीशी निगडीत असलेली घटना आहे.`[२]

(३) <u>ट्रायबथी एल.बी. यांच्यामते</u> ` वंचितता ही अनेक प्रकारे समाजात दिसून येते. उदा. सांस्कृतिक,सामाजिक,आर्थिक,शैक्षणिक,सांसारिक व परिस्थितीजन्य इत्यादी `.[३]

(४) पुष्पा एम.यांनी `Factors of Social Deprivation affecting the Primary School Childern " या लेखामध्ये यांची वंचिततेची संज्ञा दिली आहे ती अशी --

` वंचितता ही कल्पना अपयशाची बरोबरी करते कारण ती अनुभव घेण्यासाठी संधी पुरवू शकत नाही `

या शिवाय अन्य कांही संज्ञा दिल्या आहेत त्या पुढील प्रमाणे ---

` वंचितता ही सदासर्वकाळ सर्व गोष्टी आणि मानवी अनुभव यांचा समावेश असलेली संकल्पना होय `.

` वंचित लोक हे सांस्कृतिक,सामाजिक आणि शैक्षणिक अशा कोणत्याही गोष्टीचा फायदा न मिळालेले म्हणून ओळखले जातात` .

` वंचित राहिलेली मुले म्हणजे अशी मुले की जी खालच्या व कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबात वाढलेली असतात, त्यांच्या पालकांना निकृष्ठ शैक्षणिक पार्श्वभूमि लाभलेली असते व मुलांचे शिक्षण इतक्या खालच्या पातळीवर शाळेत झालेले असते की त्यामुळे त्याची प्रगती होऊ शकत नाही."

---

2. आनंदलक्ष्मी, एस - In Sinha,Durganand (ed.),Deprivation its Social roots and Psychological Consequences; Concept,New Delhi, 1982,p.37.

3. Tribathi,L.B. - "Some Methodological Problems of Deprivation Studies",in Sinha, Durganand (ed).,Deprivation,its social roots and Psychological Consequences;Concept,New Delhi,1982, p.52. Factor

4. Gordon यांची वंचिततेची संज्ञा एम.पुष्पा यांनी 'Factors of Social Deprivation affecting the Primary School Children', <u>Indian Educational Review</u> ,Vol.XVI,No.2,April,1981, p.1. लेखा मध्ये दिली आहे.

(५) गिरिश्वर, मिश्रा यांनी " Deprivation and Development " या लेखामध्ये वंचिततेची संज्ञा पुढील प्रमाणे दिली आहे --

" सर्वसामान्यपणे, वंचित रहाणे हीसंज्ञा संधी न मिळणे आणि खास हक्क प्राप्त न होणे या बाबीशी निगडीत आहे." ५

वंचिततेच्या वरील सर्व संज्ञा विचारात घेता हे स्पष्ट होते की, " वंचितता म्हणजे मानवी अनुभव, संधी आणि हक्क यापासून व्यक्तीला बाजूला ठेवले जाणे होय " या आधारावरच " शैक्षणिक वंचितता " या संकल्पनेची संज्ञा करणे सोपे आहे म्हणून संक्षेपाने शैक्षणिक वंचिततेची व्याख्या खालील प्रमाणे करता येईल :--

" शैक्षणिक वंचित व्यक्ती म्हणजे अशी व्यक्ती की जिला शैक्षणिक सुविधांचा लाभ घेता न येणे किंवा शैक्षणिक संधी पासून बाजूला ठेवले जाणे होय ". समाजातील ज्या व्यक्तींना शैक्षणिक सुविधांचा अथवा संधीचा फायदा घेता न आल्यामुळे त्या शैक्षणिकदृष्ट्या वंचित राहिल्या असा त्याचा मतितार्थ होतो.

(१२) वंचित मुलांचा वयोगट --

सर्वसाधारणपणे, निरीक्षण केल्यानंतर असे दिसते की ग्रामीण भागात, ६ ते २० या वयोगटातील मुले शिक्षणापासून अधिक प्रमाणात वंचित राहिलेली आढळतात. ६ ते २० हा वयोमानाचा कालावधी मुलांनी शिकण्याचा असतो. परंतु या वयोगटातील मुलानी शैक्षणिक सुविधाचा किंवा संधीचा लाभ घेतला नाही

---

५ मिश्रा, गिरिश्वर यांनी -- Deprivation and Development : A Review of Indian Studies;" Indian Educational Review, Vol. XVIII, No. 1, January, 1983, p. 12 या लेखामध्ये वंचिततेची संज्ञा दिली आहे.

तर अशी मुले कायमचीच शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका नाकारता येत नाही. मुलांच्या ६ ते २० वयोमानाचा कालावधी शिक्षण न घेता निघून गेला तर त्या मुलांना त्यांच्या जीवनात प्रगती करता येणे कठीण आहे म्हणून या वयोगटातील मुलांनी शिक्षण न घेण्यामागची कोणती परिस्थिती आहे त्या परिस्थितीचा शोध घेण्यासाठी मी ६ ते २० हा वयोगटातील शैक्षणिक - दृष्टया वंचित मुलांची निवड केलेली आहे. खेड्यामध्ये या वयोगटातील मुले बहुसंख्येने शिक्षणापासून अलिप्त रहात आहेत. तेव्हा या मुलांचे ६ ते २० हे शिकण्याचे वय असताना त्यांना शिक्षण कां घेता येऊ नये या मागची कारणमीमांसा शोधण्यासाठी या वयोगटातील मुलांची अभ्यासासाठी निवड केलेली आहे.